# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## सरकारी कार्यालयांसाठी कस्तुरचंद पार्क मेट्रो स्थानकावरून मेट्रो फीडर सेवा लवकरच




नागपूर: दररोज मेट्रोने प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी फस्ट आणि लास्ट माईल कनेक्टिव्हीटी (last-mile) मजबूत करण्याच्या उद्देशाने, महा-मेट्रो नागपूर महानगरपालिकेसोबत (NMC) एकत्र येऊन खास फीडर बस सेवा सुरू करण्याच्या तयारीत आहे. प्रस्तावित मार्ग कस्तुरचंद पार्क मेट्रो स्थानकावरून विविध सरकारी कार्यालयांपर्यंत थेट जोडल्या जाणार आहे.

या सेवेमध्ये समाविष्ट होणारी संभाव्य कार्यालये पुढीलप्रमाणे: पोलीस मुख्यालय, महालेखा परीक्षक कार्यालय (CAG), उच्च न्यायालय, मुख्यमंत्री कार्यालय, विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हा न्यायालय, समाज कल्याण कार्यालय, मनपा सिव्हिल लाईन्स कार्यालय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, वन भवन, शासकीय मुद्रणालय, विधान भवन आणि जीएसटी केंद्रीय व राज्य कार्यालये.

फस्ट आणि लास्ट माईल कनेक्टिव्हीटी संबंधित अडचणी सोडवून, महा-मेट्रोचा उद्देश प्रवासी संख्या वाढवणे, वाहतूक कोंडी कमी करणे आणि नागपूरमध्ये सार्वजनिक परिवहन वाहतूक वाढवणे हाच आहे. हा प्रस्तावित फीडर मार्ग 'मेट्रो संवाद' कार्यक्रमांमधून मिळालेल्या नागरिकांच्या व प्रवाशांच्या अभिप्रायाचा एक भाग आहे.

मेट्रोचा वापर करण्याचे महत्त्व अनेक व्यासपीठांवरून सातत्याने अधोरेखित करण्यात आले आहे. अशाच एका 'मेट्रो संवाद' कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच नागपूर विभागातील राज्य जीएसटी कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी नागपूर विभागाचे राज्य कर अतिरिक्त आयुक्त श्री. तेजराव पचारणे, सहआयुक्त डॉ. संजय कंधारे व श्री. राजेंद्र मसराम उपस्थित होते. त्यांनी कार्यालयीन कर्मचाऱ्यांना मेट्रोचा नियमित वापर करण्याचे आवाहन यावेळी केले.

कस्तुरचंद पार्क मेट्रो स्थानकापासून सुमारे 1.8 किमी अंतरावर असलेले राज्य जीएसटी कार्यालय हे सिव्हिल लाईन्स व सदर परिसरातील अनेक महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांपैकी एक असून, सध्या मेट्रो नेटवर्कशी थेट सार्वजनिक वाहतूक जोडणीपासून वंचित आहे. अधिकाऱ्यांनी इतर शासकीय कार्यालयांमध्येही असे संवाद आयोजित करण्याची गरज अधोरेखित केली, जेणेकरून प्रस्तावित फीडर सेवा प्रवाशांच्या गरजांशी सुसंगत राहील.

शासकीय कर्मचाऱ्यांनी दररोजच्या प्रवासासाठी सार्वजनिक वाहतूक वापरणे हा या उपक्रमाचा एक मुख्य हेतू असून, यामुळे या कार्यालयांमध्ये नियमितपणे येणाऱ्या नागरिकांनाही मेट्रो स्थानकांपासून कार्यालयांपर्यंत सुलभ व सुरक्षित प्रवासाची सुविधा मिळणार आहे.